दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक १३४ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शनिवार दि.७ ऑगस्ट २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice, Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

# ९ ऑगस्ट क्रांती दिनी गावागावात मशाल मोर्चा

## दि.बा.पाटील यांच्या नावासाठी हजारोंच्या संख्येने सहभागी होण्याचे कृती समितीचे आवाहन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**९ ऑगस्ट हा दिवस 'क्रांती दिन. १९४२ साली राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी या दिवशी मुंबई येथील गोवालिया टँक येथून समस्त भारतीयांना 'अंग्रेज चले जाओ' अशी हाक दिली. नव्या मुंबईच्या निर्मितीसह देशातील शेतकरी आणि कष्टकऱ्यांसाठी लोकनेते दि. बा. पाटीलसाहेब यांनी केलेला संघर्ष व त्याग लक्षात घेऊन आणि भूमिपुत्रांच्या अस्तित्वाची ओळख जपण्यासाठी नवी मुंबई विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचेच नाव द्यावे, ही मागणी समजून घेण्याऐवजी प्रकल्पग्रस्तांचा आवाज दाबण्याची भूमिका महाराष्ट्र सरकारने घेतली आहे. सरकारच्या या दडपशाहीचा निषेध करण्यासाठी लोकनेते दि. बा. पाटील यांच्या जन्मगावापासून ठाणे, रायगड, नवी मुंबई, मुंबईसह विविध जिल्ह्यांतील गावागावात 'मशाल मोर्चा काढण्यात येणार आहे, अशी माहिती लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समितीचे उपाध्यक्ष माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनी झालेल्या पत्रकार परिषदेत दिली.**



पनवेल येथील पनवेल उरण आगरी समाज मंडळाच्या सभागृहात झालेल्या पत्रकार परिषदेस समितीचे उपाध्यक्ष लोकनेते रामशेठ ठाकूर, कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, कामगार नेते भूषण पाटील, उपमहापौर जगदिश गायकवाड, संतोष केणे, सुरेश पाटील, गुलाब वझे, जे.डी. तांडेल, दीपक म्हात्रे, राजेश गायकर, मनोहर पाटील, विनोद म्हात्रे, आदी मान्यवर उपस्थित होते.

लोकनेते रामशेठ ठाकूर पुढे म्हणाले की, प्रत्येक मशाल ही दि. बा. पाटील यांनी दिलेल्या क्रांतीच्या लढ्याची ओळख असेल. त्यामुळे प्रत्येक गाव आपल्या भूमिपुत्रांच्या व्यथा या मशाल मोर्चाद्वारे मांडणार आहे. आणि मशाल मोर्चात शपथ घेऊन पुढच्या तीव्र आंदोलनाची दिशा जाहीर करणार असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. नावाबाबत केंद्राला घाई नाही मात्र ठराविक नाव देण्याची घाई महाराष्ट्र सरकारला झाली, त्यामुळेच संघर्षाची लढाई सुरु झाली पण हि लढाई जिंकण्यासाठी भूमिपुत्र प्रकल्पग्रस्त मैदानात उतरला आहे. १५ ऑगस्ट सरकारला डेडलाईन दिली आहे, या तारखेपर्यंत सरकारने प्रकल्पग्रस्तांच्या बाजूने न्याय द्यावा, अन्यथा १६ ऑगस्ट पासून विमानतळाचे काम बंद पाडले जाईल, अशी रोखठोक भूमिका मांडत कदापिही मागे हटायचे नाही, दिबासाहेबांचे नाव विमानतळाला लागेपर्यंत हटायचे नाही, अशी गर्जनाही केली.

पत्रकारांना अधिक माहिती देताना, कृती समितीचे कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले की, मशाल मोर्चा हा १० व २४ जून रोजी झालेल्या नामकरण आंदोलनाच्या कार्यक्रमाचा पुढील टप्पा आहे. या मशाल मोर्चासाठी ज्या मशाली प्रज्वलीत केल्या जातील त्यांची सुरूवात लोकनेते दि. बा. पाटील यांच्या जन्मगावापासून म्हणजे उरण तालुक्यातील जासई येथून, महापुरुष, हुतात्म्यांना तसेच लोकनेते दि. बा. पाटील यांना वंदन करून करण्यात येईल. त्यासाठी ९ ऑगस्ट रोजी तेथे एक मोठी क्रांती ज्योत प्रज्वलीत केली जाईल. यावेळी कृती समितीचे सदस्य व मान्यवरांच्या उपस्थितीत विविध जिल्ह्यांतून, तालुक्यातून व विभागातून आलेले विशेष प्रतिनिधी, त्या मुख्य मोठ्या ज्योतीद्वारे आपल्या मशाली प्रज्वलीत करतील व आपापल्या ठिकाणी घेऊन जातील. त्यानंतर विशेष प्रतिनिधींनी नेलेल्या मशालीची ही क्रांती ज्योत, त्या त्या ठिकाणच्या गावागावातून आलेले प्रतिनीधी, गावातील मान्यवरांच्या उपस्थितीत आपल्या गावासाठी ही क्रांती ज्योत प्रज्वलीत करतील आणि गावात वा विभागात 'मशाल मोर्चा' काढतील. यावेळी लोकनेते दि.बा.पाटील यांच्या नामकरणाची प्रतिज्ञा केली जाईल, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले. आयुष्याच्या सुरुवातीपासून ते अंतिम श्वासापर्यंत दिबासाहेबांनी लोकांसाठी संघर्ष केला. त्यांच्या संघर्षाची जाणिव भूमिपुत्रांना आहे त्यामुळे सरकारच्या दडपशाहीला भूमिपुत्र घाबरणार नाही, असेही त्यांनी यावेळी अधोरेखित केले.

कृती समितीचे खजिनदार जे. डी. तांडेल यांनी सांगितले की, आज सरकार भूमिपूत्रांना सूडाची वागणूक देत आहे. त्यामुळे ग्रामीण भागात सरकारबद्दल तीव्र संताप निर्माण झाला आहे. या आंदोलनाच्या द्वारे हा संताप व्यक्त करून, दि. बा. पाटील यांनी दिलेल्या लढ्याच्या प्रश्नांना पुन्हा वाचा फोडण्यात येईल. दि. बा. पाटील यांच्या अलौकिक कार्याची प्रेरणा घेऊन, आ-पला नामकरणाचा लढा यशस्वी करणे, हाच हेतू ध्यानात घेऊन या क्रांतीच्या मशाली प्रज्वलीत केल्या जातील, असेही त्यांनी सांगितले.

> ०९ ऑगस्ट आंदोलनाचा तिसरा टप्पा आहे. राज्यातून भूमिपुत्र एकवटला असून आंदोलनाला वाढता पाठिंबा मिळत आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसाला शुभेच्छाच्या बॅनरमध्ये शुभेच्छा देताना विमानतळाला दिबांचे नाव असे अनेक ठिकाणी बॅनर झळकले, याच्यावरून दिबांच्याच नावाला राज्यभरातून मान्यता मिळत असल्याचे स्पष्ट आहे. हे आंदोलन सर्व समाजाचे आहे त्यामुळे दिबांच्या नावासाठी सर्वांचे स्वागत आहे. त्यामुळे समितीतून सर्वपक्षीय नाव काढले नाही.
>
> **- कॉम्रेड भूषण पाटील**

## संक्षिप्त...

### सोनिया व राहुल गांधी शिवाजी पार्कात येणार



**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी काँग्रेस पक्षाने जोरदार तयारी सुरू केली आहे. काँग्रेस स्थापना दिनाचे औचित्य साधत २८ डिसेंबर रोजी शिवाजी पार्कवर काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी तसेच राहुल गांधी यांच्या उपस्थितीत भव्य मेळावा घेतला जाणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र प्रभारी एच. के. पाटील यांनी दिली आहे. टिळक भवन येथे मुंबई काँग्रेसच्या छाननी समितीची बैठक पार पडली त्यानंतर पत्रकार परिषदेला ते बोलत होते.

एच के. पाटील म्हणाले की, मुंबई महानगरपालिका निवडणुकीची रणनिती ठरवण्यासाठी आजची बैठक घेण्यात आली होती. या बैठकीत ५० मिनिटे चर्चा झाली असून जाहीरनाम्यासह निवडणुकीच्या अनुषंगाने विविध कार्यक्रमांविषयी यावेळी चर्चा झाली. महापालिका निवडणुकीत कोणत्या पक्षाबरोबर युती वा आघाडी करायची याबाबत या बैठकीत चर्चा झाली नाही तर स्थानिक पातळीवरील समीकरणे पाहून स्थानिक नेतेच त्यासंदर्भात निर्णय घेतील. महानगरपालिका निवडणुकीच्या तयारीसाठी पुन्हा एकदा लवकरच बैठक घेतली जाणार आहे, असे पाटील यांनी स्पष्ट केले. आजच्या बैठकीला एच के पाटील यांच्यासह काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधिमंडळ पक्षाचे नेते तथा महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोक चव्हाण, मत्ससंवर्धन मंत्री अस्लम शेख, शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड, मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष आमदार भाई जगताप, माजी खासदार संजय निरुपम, प्रदेश कार्याध्यक्ष चंद्रकांत हंडोरे, नसीम खान उपस्थित होते.

## जिल्हाधिकारी यांच्या संवेदनशीलतेने दोन अनाथ मुलांना मिळाले घर

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्हयाच्या जिल्हाधिकारी निधी चौधरी यांना त्यांच्या पनवेल तालुक्याच्या दौऱ्यामध्ये टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे समाजकार्य अभ्यासक्रमाचे विद्यार्थी दत्ता शिरसाट व त्यांच्या सहकाऱ्यांकडून पनवेल तालुक्यातील बाघाचीवाडी, सारसाई, पो. आपटा, ता. पनवेल या आदिवासी पाडयावरील एका कुटुंबाच्या हलाखीच्या परियस्थितीची माहिती मिळाली होती.

या कुटुंबातील २ लहान भावंडे, १ मुलगी वय वर्ष ९ व १ मुलगा वय वर्ष ७ हे अनाथ असून त्यांना राहायला नीट घर नाही. त्यांचे वडील हयात नसून आई बेपत्ता आहे. ते त्यांच्या ६८ वर्षाच्या आजीबरोबरच कसाबसा उदरनिर्वाह करून लहानशा घरात राहतात. हे घरही मोडकळीला आले असून राहण्यायोग्य नाही. हे कुटूंब घरात पावसाचे पाणी गळत असल्याने शाळेच्या व्हऱ्हांड्यात झोपत असल्याची माहिती मिळताच पुराने संपूर्ण बाधीत गावाचे योग्य पुर्नवसन करुन पूरबाधितांना दिलासा देणाऱ्या संवेदनशील जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी तात्काळ पनवेल तहसिलदार विजय तळेकर आणि महिला व बाल विकास विभागाचे जिल्हा परिविक्षा अधिकारी अशोक पाटील यांना तात्काळ त्या कुटुंबाचे व मुलांचे योग्य पुर्नवसन करण्याचे निर्देश दिले.



जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार दि. ०५ ऑगस्ट २०२१ रोजी पनवेल तहसिलदार विजय तळेकर, जिल्हा परिविक्षा अधिकारी अशोक पाटील आणि जिल्हा बाल संरक्षण अधिकारी सुजाता सपकाळ यांनी बाघाची वाडी या आदिवासी पाडयावर भेट देऊन कुटुंबाच्या घराची पाहणी केली. तहसिलदार तळेकर यांनी कुटुंबाच्या पुर्नवसनाबाबत संबंधितांना आवश्यक त्या सूचना दिल्या व महिला व बाल विकास विभागाने मुलांना ताब्यात घेऊन त्यांना एस.ओ.एस. बालग्राम, सोगाव येथे बाल कल्याण समिती रायगड यांच्याकडे दाखल केले.

जिल्हाधिकारी निधी चौधरी यांची संवेदनशीलता तसेच संबंधित विभागाने तत्परतेने केलेली कार्यवाही यामुळे दोन अनाथ बालकांना हक्काचे घर मिळाले. यामुळे कुटुंबाच्या घराचा प्रश्न शासनाच्या योजनेतून सुटणार तर आहेच परंतु त्याचबरोबर या अनाथ बालकांच्या शिक्षण, संगोपन व आरोग्य पुर्नवसनाचा प्रश्नही महिला व बाल विकास विभागामार्फत मार्गी लागणार आहे.

## कामोठे वसाहतीमध्ये अतिक्रमण विरोधी पथकाची धडक कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामोठे वसाहतीमधील कामोठे पोलीस ठाण्याच्या शेजारी असलेल्या मोकळ्या मैदानात उभ्या केलेल्या अनधिकृत भाजी मार्केट आणि मच्छी मार्केट वर आज सिडको आणि पनवेल महानगरपालिकेने संयुक्त कारवाई करत हे मार्केट जमीनदोस्त केले आहे. या कारवाई दरम्यान भाजी विक्रेत्यांनी कारवाईला विरोध देखील केला मात्र हा विरोध झुगारून पोलीस बंदोबस्तात हे मार्केट जमीन दोस्त करण्यात आले आहे.

कामोठे वसाहतीची निर्मिती केल्या नंतर, काही खाजगी भूखंड हे मैदाने, हॉस्पिटल, शाळा आणि भाजी मार्केट या साठी राखीव ठेवण्यात आले होते. मात्र या वसाहतीच्या निर्मितीनंतर या आरक्षित भूखंडावर काही राजकीय नेत्यांनी अतिक्रमण करत आपला राजकीय व्यवसाय सुरू केला होता. यामध्ये .../२



## २० वर्षीय तरुणाचा पाण्यात बुडून मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गाढेश्वर मंदिराच्या मागे असलेल्या छोट्या धरण-ाजवळ एक २० वर्षीय मुलगा बुडाला आहे. स्थानिक नागरिक आणि पोलीसांच्या मदतीने त्याचा मृतदेह बाहेर काढण्यात आला आहे. विनायक राम सागर सरोज असे या मृत तरुणाचे नाव आहे.

विनायक सरोज ( कुर्ला बैल बाजार) याच्या मित्राचा वाढदिवस असल्याने तो पनवेलमध्ये आला होता. पाच ऑगस्ट रोजी ते तीन मित्र गाढेशवर परिसरात फिरायला गेले यावेळी गाढेश्वर मंदिराच्या पाठीमागील बाजूस असलेल्या पाण्यात मौजमजा करत असताना विनायक याला पाण्याचा अंदाज आला नाही. व तो पाण्यात बुडून त्याचा मृत्यू झाला. गाढेश्वर धरणाच्या परिसरात अनेक जण मौजमजा करण्यासाठी येतात. मात्र येथील पाण्याचा अंदाज न आल्याने कित्येकाचा मृत्यू होतो. गेल्या दहा वर्षात २० हून अधिक जणांचा मृत्यू झालेला आहे. मात्र तरी देखील अनेक जण पोलिसांची नजर चुकवून या परिसरात जातात. ५ ऑगस्ट रोजी पाण्यात बुडालेल्या विनायक सरोज याचा मृतदेह स्थानिकांच्या मदतीने पोलीस हवालदार चिकणे यांनी बाहेर काढला.

## भाजपचे ज्येष्ठ नेते लक्ष्मणशेठ पाटील यांचे निधन

**दै.रायगड नगरी । पनवेल**



भारतीय जनता पक्षाचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष लक्ष्मणशेठ जोमा पाटील यांचे गुरुवारी (दि. ५) अल्पशा आजाराने निधन झाले. लक्ष्मणशेठ पाटील यांच्या पार्थिवावर शुक्रवारी (दि. ६) सकाळी पनवेल येथील अमरधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात पुत्र अविनाश, शैलेश व सचिन पाटील, मुलगी राजश्री दीपक म्हात्रे, नातवंडे असा मोठा परिवार आहे. ज्येष्ठ नेते लक्ष्मणशेठ पाटील हे प्रेमळ, मनमिळावू, मितभाषी आणि हसतमुख स्वभावाचे होते. ते आदराने दादा या नावाने सुपरिचित होते. लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांचे ते अत्यंत जवळचे सहकारी होते. निधनाबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह विविध पक्षातील पदाधिकारी, कार्यकर्ते, संस्था, संघटनांनी शोक व्यक्त केला आहे.

## शाळेची घंटा इतक्यात वाजणार नाहीच

**नवीदिल्ली : वृत्तसंस्था**

राज्यातील कोविड संसर्ग मोठ्या प्रमाणावर असलेल्या ११ जिल्ह्यांत ब्रेक दि चेन अंतर्गत तिसऱ्या पातळीचे निर्बंध कायम ठेवण्यात आले असून मुंबई, मुंबई उपनगर आणि ठाणे या ३ जिल्ह्यांत स्थानिक आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने निर्णय जाहीर केले आहेत. राज्यात हे १४ जिल्हे सोडून राज्यातील उर्वरित जिल्ह्यांमध्ये निर्बंधांमध्ये काही प्रमाणात सूट देण्यात आली आहे. मात्र, अद्यापही शाळा सुरू करण्यासंदर्भात निर्णय घेण्यात आला नाही. आता, केंद्रीय आरोग्यमंत्र्यांनी शाळा सुरू करण्यासाठी अद्याप वेट अँड वॉच अशीच भूमिका असल्याचं म्हटलं आहे.

राज्यातील काही जिल्ह्यांत निर्बंध शिथिल केले असले तरी नागरिकांनी आरोग्याचे नियम पाळावेत आणि कोणत्याही परिस्थितीत मास्क वापरत राहावे असे आवाहन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केले आहे. राज्य सरकारने २३ जिल्ह्यांत निर्बंध शिथील केल्यानंतरही चित्रपटगृहे, नाट्यगृहे, तसेच मॉल्समधील मल्टीप्लेक्स बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. यात कोणतीही सूट देण्यात आली नाही. तसेच, राज्यातील सर्वधर्मीयांची .../२

## दुकान जळून खाक



**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामोठे वसाहतीमधील सेक्टर ११ मधील कुज सोसायटी मध्ये असलेल्या कॅफे हॉटेल ला आज आग लागल्याची घटना घडली आहे. या आगी मध्ये कोणतीही जीवित हानी झाली नसली तरी हॉटेल मधील सर्व सामान जळून खाक झाले आहे. ही आग कशा मुळे लागली आहे. याचा शोध अग्निशमन दलाचे जवान घेत आहे.

कामोठे सेक्टर ११ प्लॉट नंबर ४७ मधील कुज सोसायटी मधील कॅफे हॉटेल ला आज सकाळी ११ वाजून ३० मिनीटानी ही आग लागली, आग एवढी भयानक होती की काही क्षणात हॉटेल मधील सर्व समान जळून खाक झाले. या आगीची माहिती मिळताच काही मिनिटातच कळंबोली अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी पोहचून आग आटोक्यात आणली आग लागल्याचे कारण शोधले असता ही आग शॉक सर्किट मुळे लागल्याचे पथमिक अंदाजा नुसार व्यक्त केले जात आहे.

# ही प्रक्रिया पुढे न्या

समाजातील इतर मागासवर्ग या श्रेणीत एखाद्या सामाजिक घटकाचा समावेश करावयाचा असेल, तर आता हा अधिकार त्या त्या राज्यांना मिळावा, अशा प्रकारची घटनादुरुस्ती प्रस्तावित करणाऱ्या विधेयकाच्या मसुद्याला केंद्रीय मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाचा हा निर्णय अनेक अर्थांनी महत्त्वाचा आहे. आपापल्या राज्यात ओबीसी कोण आहे, हे ठरविण्याच्या राज्यांच्या अधिकारांवर सर्वोच्च न्यायालयाच्या अलीकडच्या निकालामुळे गदा आली होती; किंबहुना तसा अधिकार राज्यांना नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते. एखादा समाजघटक आर्थिक अथवा सामाजिक किंवा दोन्हीदृष्ट्या मागास आहे का, हे केंद्र सरकारने, पर्यायाने संसदेने ठरविणे आवश्यक आहे, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते. केंद्रीय मंत्रिमंडळाने केलेल्या ठरावामुळे संसदेत योग्य ती घटनादुरुस्ती करून हा अधिकार राज्यांना मिळेल. देशातील आरक्षणाचे तिढे सोडविण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारने नवी प्रक्रिया सुरू केली आहे. ही प्रक्रिया येथेच न थांबविता पुढे नेण्याची आवश्यकता आहे. या प्रक्रियेने तार्किक परिणिती गाठल्याशिवाय या निर्णयाचा लाभ देशातील आरक्षण मागत असणाऱ्या समाजघटकांना होणार नाही. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या या ठरावाचा थेट संबंध महाराष्ट्राशी येतो. महाराष्ट्रात मराठा समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी गेली काही वर्षे आंदोलन चालू आहे. हे आरक्षण नेमक्या कोणत्या प्रकारे घटनात्मक चौकटीत बसवायचे, हे अजूनही स्पष्ट झालेले नाही. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालामुळे, मराठा आरक्षणाची लढाई अडकून पडल्यासारखी झाली होती. मंत्रिमंडळाच्या ताज्या निर्णयामुळे हा तिढा सुटेल का, हे आज सांगता येत नाही. केंद्र व राज्य सरकार यांनी संयुक्तपणे प्रामाणिक प्रयत्न केल्यास महाराष्ट्रातील मराठा; तसेच ओबीसी या दोन्हींच्या आरक्षणाचे मुद्दे तडीस लावता येतील. केंद्र सरकारने घटनादुरुस्ती विधेयकाला मंजुरी दिली असली, तरी एका घटनात्मक तरतुदीला अजूनही धक्का लागलेला नाही. ती म्हणजे, कोणत्याही प्रकारच्या आरक्षणावर असणारी पन्नास टक्क्यांची मर्यादा. केंद्र सरकारच्या निर्णयाचा आधार घेऊन, महाराष्ट्र सरकारने समजा उद्या मराठा समाजाचा समावेश ओबीसी या प्रवर्गात केला, तरी आजच्या ओबीसी आरक्षणाच्या टक्केवारीत मराठा समाजाचा अंतर्भाव करता येईल का, हा प्रश्न आहे. हा प्रश्न नवा नसून त्याची यापूर्वी अनेकदा चर्चा झाली आहे. याबाबत समाजात अनेक घटकांच्या भावना तीव्र आहेत. त्या वेळोवेळी व्यक्तही झाल्या आहेत. आत्ता असलेल्या आरक्षणाच्या टक्केवारीत नवा समाज समाविष्ट करायचा म्हणजे, इतरांनी आपल्या आरक्षणावर काही प्रमाणात पाणी सोडणे आहे. ते सध्याच्या स्थितीत शक्य नाही. ते तर्कसंगतही होणार नाही. हा मूळ पेच का आला आहे, हे पाहायला लागेल. सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने 'कोणत्याही परिस्थितीत आरक्षणाची टक्केवारी पन्नासच्या पुढे जाता कामा नये आणि खुल्या प्रवर्गात पन्नास टक्के जागा राहिल्याच पाहिजेत,' असे मागे एका निकालात म्हटले आहे. सर्वोच्च न्यायालयाचा हा निकालही कितपत तर्कशुद्ध आहे, असा प्रश्न अनेकांनी आजवर उपस्थित केला आहे. एखाद्या राज्यातील ७० ते ८० टक्के समाज जर वेगवेगळ्या निकषांनी मागास असेल, तर त्याला ५० टक्क्यांची आरक्षण मर्यादा का, असा प्रश्न यापूर्वीही विचारण्यात आला आहे. तो योग्य आहे. महाराष्ट्रातील ओबीसी आणि मराठा समाजाचे संभाव्य आरक्षण यांचा समतोल साधायचा असेल, तर सर्वोच्च न्यायालयाने घातलेली ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडून जाण्यावाचून दुसरा पर्याय आज दिसत नाही. नेमक्या याच तिढ्याचे उत्तर आज ना उद्या केंद्र सरकारला शोधावे लागणार आहे. तसे ते शोधले नाही, तर राज्य सरकारांना मिळालेला ओबीसी प्रवर्ग ठरविण्याचा अधिकार महाराष्ट्रापुरता तरी अर्थहीन ठरण्याची भीती आहे. ही ५० टक्के आरक्षणाची मर्यादा तमिळनाडू राज्याने मागेच ओलांडली आहे आणि या निर्णयाला घटनात्मक संरक्षण मिळेल, याची काळजी तत्कालीन केंद्र सरकारने घेतली होती. असेच आता पुन्हा करता येणार नाही का, असा प्रश्न मराठा आरक्षणाच्या अनुषंगाने विचारता येईल. त्याहीपेक्षा सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेली ५० टक्क्यांची मर्यादाच घटनादुरुस्ती करून काढून टाकण्यासाठी केंद्र सरकारने पावले टाकण्याची गरज आहे. सध्या केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर अनेक राज्यांमध्ये आरक्षणासाठी विविध समाज घटक आंदोलने करीत आहेत. त्यांचे समाधान करण्यात ही मर्यादा हा अडथळा ठरत आहे. उद्या एखाद्या राज्याने आपल्या लोकसंख्येतील ९० टक्के समाज घटक मागास आहेत असा निर्वाळा दिला, तर त्यांना आरक्षण द्यायचे कुठून? तसे देता आले नाही, तर एखादा समाज ओबीसी ठरविण्यालाही काही अर्थ नाही. यामुळेच, केंद्र सरकारचा हा निर्णय महत्त्वाचा असला, तरी तो अपुरा आहे.

# पूरग्रस्तांच्या मदतीला लाडिवली-पनवेलच्या बचत गटांच्या महिलांची साथ

## पोलादपूर तालुक्यातील दरडग्रस्त दुर्गम दाभिळ गावात केलं वाटप

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर यांच्या प्रयत्नातून पोलादपूर तालुक्यातील दूर्गम दरडग्रस्त दाभिळ गावासाठी दिलेली मदत रस्त्यावरील दरडी मोकळ्या होऊ लागल्यानंतर वाहनांनी रवाना करण्यात येऊन दाभिळ ग्रामस्थांना वाटप करण्यात आले. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष शैलेश पालकर यांनी स्वतः यावेळी उपस्थित राहून मदतकर्ते संतोष ठाकूर आणि अन्य सामाजिक कार्यकर्ते बंधू व भगिनींना धन्यवाद दिले.



अतिवृष्टीमुळे कोकणातील चिपळूण व महाड, पोलादपूर या तालुक्यात झालेल्या महापुराने जनजीवन पूर्णतः विस्कळीत झालेले आहे. ह्या पुराग्रस्ताना मदत करण्याचे आवाहन रायगड जिल्हाधिकारी कार्यालय आणि रायगड जिल्हा परिषदे कडून केल्यानंतर कोकण कट्टा (विलेपार्ले) राष्ट्र सेवा दल (रायगड) आणि ग्राम संवर्धन सामाजिक संस्था (बांधनवाडी) पनवेल यांच्या वतीने पुराचे पाणी ओसरताच २३ जुलै पासून राष्ट्र सेवा दलाचे रायगड जिल्हा संघटक सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पुरग्रस्तांसाठी तात्काळ मदतकार्य सुरू केले असून अत्ता पर्यंत ३ टीम अतिशय दुर्गम दरडग्रस्त गावांमध्ये जाऊन पाणी,चादर, ब्लेंकेट्स, टॉवेल,मेणबत्या, माचीस साड्या, शर्ट पॅन्ट, अंतरवस्त्र, बिस्किट्स सुके आणि तयार खाद्य पदार्थ वाटप करीत आहेत. या मदत कार्यात आता पनवेल तालुक्यातील लाडीवली, आकुलवाडी, दुष्मी गावांतील सर्वसामान्य कुटुंबांतील बचत गटाच्या महिलांनीही पुढाकार घेतला आहे. शुक्रवारी (३०जुलै ) ह्या महिलांची पहिली तुकडी महाड तालुक्यातील तळिये, आसनपोई आणि पोलादपूर तालुक्यातील दाभिळ टोक येथे गेले होते. ग्राम संवर्धन संस्थेचे समन्वयक उदय गावंड, जन संपर्क अधिकारी राजेश रसाळ, लाडीवली येथील महिला बचत गटाच्या प्रतिनिधी विजया मांडवकर, रेखा कालेकर, राजेश्री म्हामणकर, दर्शना म्हामणकर, निता वाघे, प्रशाली शेडगे, राजू पाटील, रणजित पाटील, प्रशांत पाटील, सुनील पाटील, मानसी सचिन पाटील, तेजस चव्हाण, शैलेश कोंडसकर, जयेश शिंदे, डॉ.आर.के.लोखंडे, कैलास महर, प्रविण भोईर, प्रविण गावंड, नितीन शेरमकर, विजय मांडवकर, गो ग्रीन नर्सरीचे प्रतिनिधी सलमान शेख, कोकण कट्टाचे मानिष माईन, सागर मालाप यांची उपस्थिती होती. अजूनही मदतीची गरज असल्याने यासारखी मदत गोळा करून पाठविणार आहोत तरी या कार्यात मदत दात्यानी पुढे येवून पुरग्रस्त बाधंवासाठी वस्तुरूपी किंवा आर्थिक मदत करावी असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर यांनी केले आहे. उपक्रम यशस्वी करण्यासाठी कोकण कट्टा, राष्ट्र सेवा दल, आणि ग्राम संवर्धनचे कार्यकर्ते अथक प्रयत्न केले.



# कोकणचा कॅलिफोर्निया नाही कोकणचा चिखलं ; चक्रीवादळ, महापूर, भूस्खलनला कोण जबाबदार जनतेचा टाहो

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**



कोकणची माणसं साधी भोळी काळजात त्यांच्या भरली शहाळी अशी आपण कोकणी माणसं या राजकिय पुढाऱ्यांचे नेहमीच ऐकत आलो आहोत. कोकणाचा विकास करुन कॅलिफोर्निया करणार, कोकणच्या लोककला, संस्कृती, कोकणचे समुद्र किनारे सौंदर्य कोकणावर देवाने दोन्ही हाताने निसर्गसंपत्तीची उधळण केली आहे. अनेक नर रत्नांची ही महानभूमी आहे. अशा कोकणाचा आदर्श जगाने घ्यावा व कॅलिफोर्निया वाल्यांनाच त्यांचा हेवा वाटावा. असा विकास आणि विचार खरतर आपल्या लोकप्रतिनीधींनी जगाच्यासमोर आणायला हवा होता.

येथील पश्चिमघाटी कोकणच्या मेव्यासाठी प्रसिध्द वनसंपदा, वनचरे यांचे संरक्षण करुन कोणत्याही प्रकारे जंगलतोड, पशुपक्षी, पर्यावरणाला जराही धक्का पोहचणार नाही याची काळजी घेऊनच विकास कामांसाठी परवानग्या द्यायला हव्या होत्या, पण असा कोणताही दूरदृष्टीकोन न ठेवता चाल–लेला विकास त्याचेच हे विखारी परिणाम म्हणुनच कि काय, दरडी कोसळणे, पूर, वादळ येणे अशा बिकट परिस्थितीची विनाशकारी मालिकाच सध्या सुरु झाली आहे.

नैसर्गिक सौंदर्य स्थळी अतिक्रमणे केल्यानेच निसर्ग संप्पन्न कोकणच्या भूमीची नैसर्गिक आपत्तीने जी अवस्था झाली आहे. याला जबाबदार नेमके कोण ? या प्रश्नाची उत्तर शोधण्यासाठी खरतर भूवैज्ञानिकांनी या अधोगतीला थोपविण्यासाठी या सर्व घटनांच्या मुळाशी जाण्याची गरज आहे. किती जोराचा आणि किती मि.ली. पाऊस पडला, जागतिक तापमानचा परिणाम या सर्व अभ्यासपूर्ण विवेचनातून कदाचित याची उत्तर सापडणार नाहीत.

कारण प्रचंड पाऊस, वादळवारा, पूर या गोष्टी कोकणाला नविन नाहीत. मग अस काय घडलय; ज्याने अचानक असे पूर चिखलाचपाणी, ज्या ठिकाणी कधीच पूराच पाणी आल नाही तिथे हे पाणी भरतय. या सर्वाच उत्तर या महाड, पोलादपूर, चिपळूणच्या महापूरामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर येथिल सर्वसामान्य जनतेच्या प्रतिक्रियां मधुन सहजी मिळत आहे. संबंधित प्रशासन व लोकप्रतिनीधींनी या दृष्टीकोनातून प्रयत्न करुन कोकणाची वेगाने चाल–लेली परवड थांबविण्या साठी प्रयत्नांची गरज आहे.

खरतर कॅलिफोर्निया वाल्यांना आपलासा वाटवा असा कोकणचा प्रदेश आहे. विकास कामांच्या नावाने मातीचे उंच भराव, बेसुमार वृक्षतोड, डोंगर–खडक पोखरुन चाललेले व्यवसाय, वाळू उत्खनन एक ना अनेक कारणे आहेत. आता त्याचे दूष्परिणाम कोकणात दिसत आहेत. पूराच्या पाण्याला नेहमी प्रमाणे नैसर्गिक पणे पसरण्याचे मार्ग बंद झा–लेत विभागले गेलेत आणि आपणच पोखरलेल्या डोंगरदरीतील नवनविन भरावाची माती पाण्याच्या वेगवान प्रवाहाबरोबर वाट मिळेल त्या ठिकाणी वाहुन आली आणि ज्या भागात कधी पाणी शिरत नव्हत अशा भागातही पूर आला चिखलाने दैन्यावस्था झाली अशा प्रतिक्रिया गेले अनेक वर्षापासून या भागात वास्तव्यास असलेल्या जनते मधुन व्यक्त होत आहेत. या पूरात नुकसानी बाबत महाड मधिल एका व्यावसायिकाने आमचे जवळ दिलेली माहीती अशी कि या पूरपिडिताचे जवळपास एक करोडचे नुकसान झाले. तो वीस माणसांना रोजगार देत होता. त्याचा डिजीटल प्रिंटींगचा व्यवसाय होता. त्याच्या दुकानातील लागणारे सर्व मटेरियल सह अत्याधुनिक मशनरी, सर्व चिखलात बुडाले सारे उद्ध्वस्त झाले. क्षणात होत्याचे नव्हते झाले! गेले आठवडाभर हे गृहस्थ एकच बनियन व चिखलातुन वाचलेला पांढरा स्वच्छ रेनकोट कसाबसा धुवून मळकट रंगाचा झाला तरी वापरत असुन तो दाखवत हा मनुष्य बोलतो;

आता सरकार तरी किती मदत करणार! फार फार तर पंचविस हजार रुपयांची,कोणालाही दोष न देणारी ही कोकणची साधी भोळी माणसं व्यक्त होऊन म्हणतात मुळातच वैभव संपन्न असलेल्या कोकणचा कॅलिफोर्निया नको, आवरा आता ही भुलावन! उंच उंच भराव, उत्खनन करुन डोंगर पोखरणाऱ्या या शासन आणि संबंधितांच्या अभद्रयुती व विनाशकारी प्रवृत्ती मुळेच कोकणचा चिखल होत आहे. अनियंत्रीत बेलगाम विकासाची कोकणला काही गरज नाही. अशी हृदय चिरणारी प्रतिक्रिया ऐकावयास मिळाली. जागा हो देवा, आता तरी पाझर फूटू दे, आणखी किती परिक्षा घेणार असा गर्भगळीत टाहो फुटून लोकांच्या सहनशिलतेचा बांध फूटला आहे.

# सत्यमेव जयते ट्रस्ट इंडियाच्या माध्यमातून पुरग्रस्तांना मोठ्या प्रमाणात मदत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

काही दिवसांपूर्वी महाड आणि चिपळूण याठिकाणी अतिवृष्टीचा मुळे महापूराच्या विळख्यात अडकून पडले आणि निसर्गाच्या विक्राळ रूपाने लोकांचे संसार उध्वस्त केले. सत्यमेव जयते ट्रस्ट इंडिया नेहमीच माणुसकीच्या दृष्टिकोनातून कार्यरत असते. त्यातूनच त्यांनी मोठ्या प्रमाणात या भागासाठी मदतीचा हात दिला आहे.

प्रशांत पाटील महाराष्ट्र सचिव सत्यमेव जयते ट्रस्ट यांच्या विशेष आयोजनातून, विरार येथील तुकाराम आंबो पाटील यांनी दिलेल्या प्रेरणेने त्यांचे चिरंजीव विकास पाटील यांच्या कल्पनेतून, आशुतोष गहिवाल आणि आंबो वाडी मित्र परिवार, व्हिजन ह्यूमॅनिझम यांच्या संयुक्त संकल्पनेतून चिपळूण आणि महाड येथील पूरग्रस्तांना अल्पशी मदत किंबहुना दुःखावर अंशतः फुंकर घालण्यासाठी या सगळ्या संघटना मिळून मदत घेवून पोहोचल्या. १ टेम्पो धान्य, पिठ, कपडे, ब्लॅकेट, बिस्कीट, पिण्याचे पाणी, बल्ब, स्यानिटाईझर, हॅण्डवॉश, सॅनिटरी पॅड् पॅकेट, पॅकेज फूड बराच जीवनावश्यक वस्तूंचे वाटप त्यांनी आपल्या कोकणतिल बांधवांना केले आणि स्वच्छतेच्या कामात हातभार देखील लावला. जे शक्य झाले त्या वस्तुरुपी, खाद्यरुपी आणि वस्त्ररुपी संग्रहातून सहकार्य म्हणून आधी चिपळूण मग महाड येथे जाऊन वाटप करण्यात आले. महाड मध्ये पुन्हा एकदा मदत पाठवण्याचा मानस प्रशांत पाटील यांनी व्यक्त केला कारण तेथील पूर्ण गावच उद्ध्वस्त झाले आहे. खरोखर मोलाची कामगिरी करून लावलेला हातभार खूप काही शिकवून जातो. कोणताही आविर्भाव न आणता पोटतिडकीने केलेले काम समाधान देते हीच भावना सर्व मित्र परिवाराची होती. पण आपण कितीही केले तरी या पूरग्रस्त नागरिकांचे दुःख फक्त हलके करू शकतो असे सांगून या संकटातून ते लवकर उभारी धरोत हीच मनोकामना सर्वांनी व्यक्त केली. ह्या वेळी संदीप पाटील, नितीन बने, केदार सावंत, महेश खाके, हितेन, रितेश पाटील, प्रफुल्ल शिंदे, चिन्मय जोशी, राज मन्सूरी, शमीम शेख, आरिफ, आदी कार्यकर्त्यांनी उपस्थित राहून मोलाचे सहकार्य केले, त्याबद्दल सत्यमेव जयते ट्रस्ट इंडियाच्या अध्यक्षा शितलताई मोरे यांनी सर्व सहकार्यांचे आभार व्यक्त केले, ही मदत नसून आपले माणूस म्हणून कर्तव्य आहे, पुढेदेखील आपण अशीच सामाजिकबांधिलकी जपू अशी भावना व्यक्त केली.



# चिकणी पूलाचे काम वेळेत पूर्ण व्हावे : पाण्याच्या निचरासाठी पूलाला एक गाळा वाढविण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे साळाव–मुरुड रस्त्यावर काशिद ग्रामपंचायत हद्दीतील खचलेल्या चिकणी पूलाच्या भरावाचे होत असलेले काम वेळेत पूर्ण व्हावे तसेच पूर व भरतीच्या वेळी पाण्याचा धोका लक्षात घेऊन या पूलाला एक गाळा वाढविण्याची मागणी स्थानिक ग्रामस्थांच्या वतीने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष शैलेश खोत यांनी केली आहे.

जोरदार पावसामुळे दि.११ जुलै रोजी तालुक्यातील काशिद पूल कोसळून घडलेली घटना ताजी असताना पावसाळ्यापूर्वी तालुक्यातील छोट्या मोठ्या पूलावरुन झालेल्या अवजड वाहतूकीने पूल कमकुवत होऊन त्यांना अखेरची घरघर लागल्याचे चित्र चिकणी,विहूर येथील पूलाच्या पावसाळ्यात झालेल्या दुरावस्थेने समोर आले. पुढील महिन्यात नारळी पौर्णिमा– रक्षाबंधन,गौरी गणपती सण येत असून मुंबई पुणे अन्य ठिकाणाहून चाकरमानी गावाकडे येत असतात.याकरिता अलिबाग–साळाव–मुरुड मार्गावर एस.टी.सेवा लवकरात लवकर सुरु होणे अपेक्षित आहे.यासाठी चिकणी व विहूर येथील पूलाच्या भरावाचे काम वेळेत पूर्ण व्हावे व चिकणी पूलाला पूराच्या पाण्याचा पुरेपूर निचरा होण्यासाठी एक गाळा वाढविण्यासाठी योग्य ती उपाययोजना करण्यात यावी. अशी मागणी शैलेश खोत यांनी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आली आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## अतिक्रमण विरोधी पथकाची धडक कारवाई

भाजी मार्केट चा व्यवसाय तेजीत उभा राहू लागला होता. या मध्ये कामोठे वसाहतीमधील कामोठे पोलीस ठाण्याच्या शेजारी असलेल्या मोकळ्या मैदानाचा समावेश होता. हा मोकळा भूखंडावर कॉलेज आणि मैदान असे दोन ते तीन आरक्षण पडलेले आहे. त्या मुळे हा भूखंड सध्या तरी मोकळा ठेवणे अपेक्षित होते , या ठिकाणी कामोठे वसाहतीमधील राजकीय कार्यक्रम तसेच वसाहतीमधील संस्कृतीक कार्यक्रम, क्रिकेट मॅच आणि व्यायामासाठी या मैदानाचा वापर परिसरातील रहिवाशी आणि युवक करत होते, हे मार्केट उभे करताना या मैदानात बोर व्हेल मारण्यात आली होती, तसेच पाण्याच्या साठवणूकीसाठी पाण्याची टाकी बांधण्यात आली होती. अशा या अनधिकृत मार्केट वर आज पोलीस बंदोबस्त मध्ये कारवाई करण्यात आली आहे. या वेळी मार्केट मधील भाजी विक्रेत्यांनी रत्यावर उतरून विरोध देखील दर्शविला होता. मात्र अखेर आज कारवाई करत हे मार्केट जमीनदोस्त केले आहे.

## शाळेची घंटा इतक्यात वाजणार नाहीच

प्रार्थना स्थळेही बंदच राहणार आहेत. राज्यातील शाळा, महाविद्यालयांबाबत शालेय शिक्षण व उच्च शिक्षण विभाग निर्णय घेईल, असे राज्य सरकारने म्हटले आहे. मात्र, केंद्रीय आरोग्यमंत्र्यांनी शाळा सुरू करण्यासंदर्भात अजून काही दिवस थांबावे लागेल असे म्हटले आहे.

राज्यात शाळा सुरू करण्याची घाई नको, त्यासाठी अजून काही काळ थांबावं लागेल, असे आरोग्यमंत्री डॉ. भारती पवार यांनी म्हटलं आहे. परदेशात आणखी नवीन स्ट्रेन सापडले आहेत, त्यातच महाराष्ट्रात कोविडच्या केसेस अधिक आहेत. दुसरीकडे लहान मुलांवर लसीकरण ट्रायल सुरू आहे. त्यामुळे, मुलांना शाळेत पाठविण्यासाठी अजून वाट पाहावी लागेल, असे पवार यांनी सांगितले. त्यामुळे, शाळेची घंटा वाजायला आणखी अवधी असणार असल्याचे स्पष्ट होताना दिसत आहे.


# ग्रुप ग्रामपंचायत चाणजे

ता.उरण, जि.रायगड

**जाहीर निविदा**

ग्रामपंचायत चाणजे, ता.उरण, जि.रायगड जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण सन २०२०/२०२१ अंतर्गत जन सुविधा योजनेंतर्गत मंजूर कामाकरिता शासनाच्या योग्य त्या नोंदणीकृत ठेकेदाराकडून मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहे. तरी खालील कामांचे कोष्टकात नमूद केल्याप्रमाणे इच्छुक ठेकेदाराने मोहोरबंद निविदा सादर करण्यात याव्यात.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | १% इसारा रक्कम | निविदा फी | निविदा फॉर्म मिळण्याचे | | निविदा स्वीकारण्याची अंतिम तारीख | काम पूर्ण करण्याची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ठिकाण | दिनांक | | |
| १ | चाणजे ग्रामपंचायत कोळीवाडा मुळेखंड येथे स्मशानभूमीचे बांधकाम करणे | ५०००००/– | ५००० | १००० | ग्रा.पं. कार्यालय | ९/८/२०२१ ते १७/८/२०२१ दुपारी २.०० वाजेपर्यंत | १७/०८/२०२१ कार्यालयीन वेळेतपर्यंत | ६ महिने |
| २ | मुळेखंड येथील रस्त्याला आर.सी.सी. गटार तयार करणे | ५०००००/– | ५००० | १००० | ग्रा.पं. कार्यालय | ९/८/२०२१ ते १७/८/२०२१ दुपारी २.०० वाजेपर्यंत | १७/०८/२०२१ कार्यालयीन वेळेतपर्यंत | ६ महिने |

अटी व शर्ती :–

१) निविदा मंजूर झालेल्या ठेकेदारास काम करण्यासाठी कोणत्याही प्रकारे ॲडव्हान्स रक्कम दिली जाणार नाही.
२) ठेकेदार हा शासकीय नोंदणीकृत ठेकेदार असणे बंधनकारक आहे.
३) निविदा फॉर्म घेतेवेळी मुळ नोंदणीपत्र व आयकर दाखला जी.एस.टी. नंबर ॲक्टीव दिल्यानंतरच निविदा फॉर्म दिला जाईल.
४) कामाचे मुल्यांकन जिल्हा परिषदेकडील व पंचायत समितीकडील तांत्रिक अधिकारी यांचेकडून केले जाईल व त्याप्रमाणे उपलब्ध झालेल्या निधीनुसार रक्कम अदा केले जाईल.
५) निविदा मंजूर झालेल्या ठेकेदाराने रुपये ५०० च्या बॉन्ड पेपरवर करारनामा लिहून देणे बंधनकारक राहील.
६) निविदा मंजूर झाल्यानंतर संबंधित ठेकेदाराने १५ दिवसांत काम सुरू करावयाचे आाहे.
७) निविदे बरोबर इसारा रक्कम भरणा केलेली पावती जोडणे आवश्यक आहे. अन्यथा निविदा बाद करण्यात येईल.
८) निविदा उघडण्याची तारीख दि.१८/०८/२०२१ रोजी दुपारी ११ वाजता ठिकाण ग्रामपंचायत कार्यालय
९) कोणतीही निविदा कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार सरपंच यांनी राखून ठेवला आहे.

**सही/–**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत चाणजे**

**सही/–**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत चाणजे**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

रजिस्ट्री सं. डी.एल.- 33004/99 REGD. No. D. L.-33004/99

# भारत का राजपत्र
# The Gazette of India

सी.जी.-डी.एल.-अ.-10062021-227461
CG-DL-E-10062021-227461

असाधारण
EXTRAORDINARY

भाग II—खण्ड 3—उप-खण्ड (ii)
PART II—Section 3—Sub-section (ii)

प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY

सं. 2055] नई दिल्ली, बुधवार, जून 9, 2021/ज्येष्ठ 19, 1943
No. 2055] NEW DELHI, WEDNESDAY, JUNE 9, 2021/JYAISTHA 19, 1943

## सड़क परिवहन एवं राजमार्ग मंत्रालय

### अधिसूचना

नई दिल्ली, 9 जून, 2021

**का.आ. 2215(अ).**—केन्द्रीय सरकार, राष्ट्रीय राजमार्ग अधिनियम 1956 (1956 का 48) (जिसे इसमें इसके पश्चात् उक्त अधिनियम कहा गया है) की धारा 3क की उप-धारा (1) द्वारा प्रदत्त शक्तियों का प्रयोग करते हुए, यह समाधान हो जाने के पश्चात् कि महाराष्ट्र राज्य के रायगड जिले में NH548A के कि.मी. 43.783 से कि.मी. 69.508 (सदो, कर्जत, हाइड्रो कॉलोनी, दहिवड़ी, कर्जत) तक के भू-खण्ड के निर्माण (चौड़ीकरण/पेव्ड शोल्डर सहित 2-लेन/4-लेन का बनाना आदि), अनुरक्षण, प्रबन्धन और प्रचालन के लोक प्रयोजन के लिए वह भूमि अपेक्षित है जिसका संक्षिप्त वर्णन नीचे अनुसूची में दिया गया है, ऐसी भूमि का अर्जन करने के अपने आशय की घोषणा करती है।

कोई भी व्यक्ति, जो उक्त भूमि में हितबद्ध है, उक्त अधिनियम की धारा 3ग की उप-धारा (1) के अधीन पूर्वोक्त प्रयोजन के लिए ऐसी भूमि के उपयोग पर राजपत्र में इस अधिसूचना के प्रकाशन की तारीख से इक्कीस दिन के भीतर अपनी आपत्ति प्रकट कर सकेगा।

ऐसी प्रत्येक आपत्ति सक्षम प्राधिकारी, अर्थात् सब-डिविशनल अफसर , कर्जत को लिखित रूप मे प्रस्तुत की जाएगी और उसमें उसके आधार अधिकथित किए जाएंगे और सक्षम प्राधिकारी, आपत्तिकर्ता को व्यक्तिगत रूप मे या किसी विधिक पेशेवर द्वारा सुने जाने का अवसर देगा और ऐसी आपत्तियों की सुनवाई के पश्चात् तथा ऐसी और जाँच करने के पश्चात्, यदि कोई हो, जिसे सक्षम प्राधिकारी आवश्यक समझे, आदेश द्वारा या तो आपत्तियों को अनुज्ञात कर सकेगा या अननुज्ञात कर सकेगा।

उक्त अधिनियम की धारा 3ग की उप-धारा (2) के अधीन सक्षम प्राधिकारी द्वारा किया गया कोई भी आदेश अंतिम होगा।

इस अधिसूचना के अंतर्गत आने वाली भूमि के रेखांक और अन्य ब्यौरे सक्षम प्राधिकारी के उक्त कार्यालय में उपलब्ध हैं और उनका हितबद्ध व्यक्तियों द्वारा निरीक्षण किया जा सकता है।

### अनुसूची

**महाराष्ट्र राज्य के रायगड जिले में NH548A के कि.मी. 43.783 से कि.मी. 69.508 (सदो, कर्जत, हाइड्रो कॉलोनी, दहिवड़ी, कर्जत) के लिए अर्जन की जाने वाली संरचना रहित अथवा संरचना सहित भूमि का संक्षिप्त विवरण।**

| राज्य का नाम: महाराष्ट्र | जिले का नाम: रायगड | | | | |
|---|---|---|---|---|---|
| क्रमिक संख्या | सर्वेक्षण संख्या | भूमि का प्रकार | भूमि की प्रकृति | भूमि का क्षेत्रफल (स्थानीय इकाई) | भूमि का क्षेत्रफल (हेक्टेयर) |
| तालुक का नाम: कर्जत | | | | | |
| गांव का नाम: कलम्ब | | | | | |
| 1 | 160/2/A | निजी( प्राइवेट) | एग्रीकल्चरल | 0.0035000(हेक्टेयर) | 0.0035000 |
| 2 | 160/2/D | निजी( प्राइवेट) | एग्रीकल्चरल | 0.0039000(हेक्टेयर) | 0.0039000 |
| 3 | 160/2/E | निजी( प्राइवेट) | एग्रीकल्चरल | 0.1030000(हेक्टेयर) | 0.1030000 |
| 4 | 160/6 | निजी( प्राइवेट) | एग्रीकल्चरल | 0.0120000(हेक्टेयर) | 0.0120000 |
| 5 | 91/1 | निजी( प्राइवेट) | एग्रीकल्चरल | 0.0500000(हेक्टेयर) | 0.0500000 |
| 6 | 92/1 | निजी( प्राइवेट) | एग्रीकल्चरल | 0.0710000(हेक्टेयर) | 0.0710000 |
| 7 | 92/2 | निजी( प्राइवेट) | एग्रीकल्चरल | 0.0660000(हेक्टेयर) | 0.0660000 |
| गांव का नाम: नालधे | | | | | |
| 1 | 1/1 | निजी( प्राइवेट) | एग्रीकल्चरल | 0.1230000(हेक्टेयर) | 0.1230000 |
| 2 | 1/2 | निजी( प्राइवेट) | एग्रीकल्चरल | 0.1070000(हेक्टेयर) | 0.1070000 |
| 3 | 1/3 | निजी( प्राइवेट) | एग्रीकल्चरल | 0.0040000(हेक्टेयर) | 0.0040000 |
| 4 | 2/6A/1 , 2/6A/2 | निजी( प्राइवेट) | एग्रीकल्चरल | 0.0530000(हेक्टेयर) | 0.0530000 |
| गांव का नाम: पोही | | | | | |
| 1 | 10/2 | निजी( प्राइवेट) | एग्रीकल्चरल | 0.3137000(हेक्टेयर) | 0.3137000 |
| 2 | 10/3 | निजी( प्राइवेट) | एग्रीकल्चरल | 0.3137000(हेक्टेयर) | 0.3137000 |
| 3 | 8 | निजी( प्राइवेट) | एग्रीकल्चरल | 0.1000000(हेक्टेयर) | 0.1000000 |
| गांव का नाम: सुगवे | | | | | |
| 1 | 16/18A/1 | निजी( प्राइवेट) | एग्रीकल्चरल | 0.0570000(हेक्टेयर) | 0.0570000 |
| 2 | 16/18A/2 | निजी( प्राइवेट) | एग्रीकल्चरल | 0.0700000(हेक्टेयर) | 0.0700000 |
| 3 | 3/8 | निजी( प्राइवेट) | एग्रीकल्चरल | 0.0420000(हेक्टेयर) | 0.0420000 |
| | | | कुल | 1.4928 | 1.4928 |

[फा. सं. RW/NH-12014/118/2017/MAH/3A]

क्र.जिमाका/राअ/जाहि/८०/२०२१-२२

राजेश गुप्ता, निदेशक

रजिस्ट्री सं. डी.एल.- 33004/99 REGD. No. D. L.-33004/99

# भारत का राजपत्र
# The Gazette of India

सी.जी.-डी.एल.-अ.-10062021-227461
CG-DL-E-10062021-227461

असाधारण
EXTRAORDINARY

भाग II—खण्ड 3—उप-खण्ड (ii)
PART II—Section 3—Sub-section (ii)

प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY

सं. 2055] नई दिल्ली, बुधवार, जून 9, 2021/ज्येष्ठ 19, 1943
No. 2055] NEW DELHI, WEDNESDAY, JUNE 9, 2021/JYAISTHA 19, 1943

## MINISTRY OF ROAD TRANSPORT AND HIGHWAYS

### NOTIFICATION

New Delhi, the 9th June, 2021

**S.O. 2215(E).**—In exercise of powers conferred by sub-section (1) of section 3A of the National Highways Act, 1956 (48 of 1956) (hereinafter referred to as the said Act), the Central Government, after being satisfied that for the public purpose, the land, the brief description of which is given in the Schedule below, is required for building (widening/two lane with paved shoulder/four laning etc.,), maintenance, management and operation of NH548A in the stretch of land from Km. 43.783 to Km. 69.508 (SDO , Karjat ,Hydro colony , Dahiwadi , Karjat) in the district of RAIGAD in the state of MAHARASHTRA, hereby declares its intention to acquire such land.

Any person interested in the said land may, within twenty-one days from the date of publication of this notification in the Official Gazette, object to the use of such land for the aforesaid purpose under sub-section(1) of section 3C of the said Act.

Every such objection shall be made to the Competent Authority, namely, Sub-Divisional Officer, Karjat in writing and shall set out the grounds thereof and the Competent Authority shall give the objector an opportunity of being heard, either in person or by a legal practitioner, and may, after hearing all such objections and after making such further enquiry, if any, as the Competent Authority thinks necessary, by order, either allow or disallow the objections.

Any order made by the Competent Authority under sub-section (2) of section 3C of the said Act shall be final.

The land plans and other details of the land to be acquired under their notification are available and can be inspected by the interested person at the aforesaid office of the Competent Authority.

### SCHEDULE

**Brief Description of the land to be acquired with or without structures falling NH548A in the stretch of land from Km. 43.783 to Km. 69.508 (SDO, Karjat, Hydro colony, Dahiwadi , Karjat) in the district of RAIGAD in the state of MAHARASHTRA.**

| State: MAHARASHTRA | District: RAIGAD | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Sl. No. | Survey / Plot Number | Type of Land | Nature of Land | Area (in Local Unit) | Area (in Hectare) |
| Taluk: Karjat | | | | | |
| Village: Kalamb | | | | | |
| 1 | 160/2/A | Private | Agricultural | 0.0035000(Hectare ) | 0.0035000 |
| 2 | 160/2/D | Private | Agricultural | 0.0039000(Hectare ) | 0.0039000 |
| 3 | 160/2/E | Private | Agricultural | 0.1030000(Hectare ) | 0.1030000 |
| 4 | 160/6 | Private | Agricultural | 0.0120000(Hectare ) | 0.0120000 |
| 5 | 91/1 | Private | Agricultural | 0.0500000(Hectare ) | 0.0500000 |
| 6 | 92/1 | Private | Agricultural | 0.0710000(Hectare ) | 0.0710000 |
| 7 | 92/2 | Private | Agricultural | 0.0660000(Hectare ) | 0.0660000 |
| Village: Naldhe | | | | | |
| 1 | 1/1 | Private | Agricultural | 0.1230000(Hectare ) | 0.1230000 |
| 2 | 1/2 | Private | Agricultural | 0.1070000(Hectare ) | 0.1070000 |
| 3 | 1/3 | Private | Agricultural | 0.0040000(Hectare ) | 0.0040000 |
| 4 | 2/6A/1 , 2/6A/2 | Private | Agricultural | 0.0530000(Hectare ) | 0.0530000 |
| Village: Pohi | | | | | |
| 1 | 10/2 | Private | Agricultural | 0.3137000(Hectare ) | 0.3137000 |
| 2 | 10/3 | Private | Agricultural | 0.3137000(Hectare ) | 0.3137000 |
| 3 | 8 | Private | Agricultural | 0.1000000(Hectare ) | 0.1000000 |
| Village: Sugave | | | | | |
| 1 | 16/18A/1 | Private | Agricultural | 0.0570000(Hectare ) | 0.0570000 |
| 2 | 16/18A/2 | Private | Agricultural | 0.0700000(Hectare ) | 0.0700000 |
| 3 | 3/8 | Private | Agricultural | 0.0420000(Hectare ) | 0.0420000 |
| | | | Total | 1.4928 | 1.4928 |

[F. No. RW/NH-12014/118/2017/MAH/3A]

RAJESH GUPTA, Director

# म्हसळ्यात श्री संत नामदेव महाराज समाधी सोहळा साधेपणात आणि उत्साहात संपन्न

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

श्री संत शिरोमणी नामदेव महाराज यांचा ६७१ वा समाधी सोहळा आज दिनांक ६ ऑगस्ट २०२१ रोजी शिंपी समाज म्हसळा यांच्या विद्यमाने श्री नामदेव महाराज मंदिरात मोठ्या उत्साहात आणि आनंदात संपन्न झाला.

कोरोना संकटामुळे सोशल डिस्टसिंगची खबरदारी राखून नामदेव महाराज मंदिरात संत नामदेव महाराजांच्या प्रतिमेची विधिव्रत पूजा करण्यात आली. संपूर्ण शहरातून टाळ-मृदूंगाच्या गजरात संत नामदेव महाराजांच्या प्रतिमेची साधेपणात मिरवणूक काढून समाधी सोहळ्याचा आनंद शिंपी समाजाच्या सर्व ज्ञाती बांधवांनी मनसोक्त लुटला.

म्हसळा नामदेव समाज अध्यक्ष प्रसाद करंबे, संजय पाटुकले, माजी अध्यक्ष दादा पानसरे, अजय करंबे, महेंद्र ढवळे, रणजित बारटक्के, दिलीप करंबे, अनिकेत पानसरे, संतोष पानसरे, प्रमोद कळस, महिला मंडळ अध्यक्षा निलम ढवळे, पप्पू कोकचा, आदी समजबंधवांच्या उपस्थितीत समाधी सोहळ्याचे उत्तम प्रकारे नियोजन करण्यात आले होते.समाज मंदिरात संत नामदेव महाराजांची विधिव्रत पूजा करण्यात आली.

# पनवेल तालुक्यातील वारदोली तलाठी कार्यालयांकरिता बेलवली येथील शासकीय जागा हस्तांतरित

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

तलाठी कार्यालय हे नागरिकांसाठी ग्रामीण स्तरावरील अत्यंत महत्त्वाचे कार्यालय मानले जाते. या कार्यालयातून जन–तेची महसूलविषयक सर्व प्रकारची महत्त्वाची कामे केली जातात.

ग्रामीण भागातील जनतेची महसूलविषयक कामे सुलभ व्हावीत, प्रशासन गतिमान व्हावे तसेच येथील अधिकारी–कर्मचाऱ्यांच्या व या कार्यालयात विविध कामांसाठी येणाऱ्या नागरिकांच्या दृष्टीने या तलाठी कार्यालयाची इमारत सुसज्ञ व अद्ययावत असणे, ही काळाची गरज होती, या दृष्टीने पालकमंत्री या नात्याने कु.आदिती तटकरे यांनी व्यक्तिशः लक्ष देण्यास सुरुवात केली.

या पार्श्वभूमीवर पनवेल तालुक्यातील वारदोली या तलाठी कार्यालयांच्या इमारतींच्या बांधकामासाठी जमिनीची मागणी केली होती. याबाबत पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी संबंधितांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते.

त्यानुसार तलाठी सजा वारदोलीसाठी मौजे बेलवली येथील स.नं ६६ क्षेत्र १.१०.०० हे.आर.पैकी ०.०५.०० हे.आर. ही शासकीय जमीन महसूल मुक्त व सारामाफीने वारदोली तलाठी कार्यालयाच्या इमारतीच्या बांधकामासाठी पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांच्या निर्देशानुसार हस्तांतरीत करण्याचे आदेश जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी जारी केले आहेत.

यामुळे खऱ्या अर्थाने महसूल प्रशासन गतिमान होऊन जनतेला महसूल विषयक सोयी सुविधा सुलभतेने मिळतील. विविध प्रशासकीय कार्यालयांच्या नव्या इमारतीसाठी व अद्ययावतीकरणासाठी पालकमंत्री कु. आदिती तटकरे करीत असलेल्या पाठपुराव्यामुळे प्रशासन निश्चितच गतिमान होण्यास मोठा हातभार लागणार आहे. यामुळे जिल्ह्यातील जनतेमध्ये पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या कामाविषयी सर्वत्र समाधान व्यक्त केले जात आहे.

# श्रीवर्धनकरांचे सीमेवरील सैनिकांसाठी रक्षाबंधन ; सह्याद्री विद्यार्थी अकादमीचा पुढाकार

**दै.रायगड नगरी । दिघी**

श्रीवर्धन तालुक्यातील सह्याद्री विद्यार्थी अकादमीने रक्षाबंधनाच्या निमित्ताने देशाच्या रक्षणासाठी सीमेवर लढणाऱ्या सैनिकांना राखी बांधून हा सण साजरा करण्याचे ठरविले आहे.

येथील सह्याद्री प्रतिष्ठान महाराष्ट्र पुरस्कृत श्रीवर्धन तालुका विभागाकडून दरवर्षी सामाजिक उपक्रम राबविले जातात. यामध्ये गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, वृक्षारोपण, रक्तदान शिबिर, बाप्पा माझा विद्येचा राजा, तसेच रद्दी महोत्सव, विशेषतः गडकिल्ल्यांच्या संवर्धन सोबत गरजूंना मदतीचे असे अनेक स्तुत्य उपक्रम राबविण्यात आले आहेत. गतवर्षी सीमेवरील जवानांना रक्षाबंधन सणाला राख्या पाठवण्याचा कार्यक्रम अकादमीने सुरू केलं आहे. यावर्षी ही सर्व सदस्यांच्या सहभागाने उत्स्फूर्तपणे हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

रक्षणकर्त्या भारतीय सैनिकासाठी एक प्रेमाचा ऋणानुबंध म्हणून राखी पाठवण्यात येणार असून देशाच्या सीमेचे डोळ्यांत तेल घालून संरक्षण करणारे जवान व लष्कराप्रती आदरभाव आणि कृतज्ञता व्यक्त करताना हा सण जोपासण्याचा सह्याद्री परिवाराचा हेतु असल्याचे अकादमीचे संपर्क प्रमुख प्रयोग किर यांनी सांगितले. या कार्यात सहभागी होऊन आपली राखी जवानांना पाठवायची आहे. त्यामुळे ८ ऑगस्ट पर्यंत आपली राखी अनुप्रिता विलणकर संपर्क ०८४०७९२६४६१ आणि ऐश्वर्य विलणकर ०९११२११९९७३ या सदस्यांकडे सुपूर्द करायची आहे असे आवाहन अकादमीच्या वतीने करण्यात आले आहे. जवान भारतीय सीमेवर अहोरात्र रक्षण करत असतात, त्यांच्यासाठी देशाचे रक्षण पहिले कर्तव्य असते. त्यामुळे त्यांना घरी येऊन रक्षाबंधन वा अन्य सणही साजरे करता येत नाही. त्यामुळे भारतीय सैनिकांप्रती असलेले प्रेम व आदर व्यक्त व्हावा तसेच त्यांनाही आ–पली कुणीतरी काळजी करीत असल्याचा संदेश जाण्यासाठी प्रतिष्ठानने रक्षाबंधनानिमित्त राखी जमा करण्याचे अभियान हाती घेतले आहे.

# अबोली रिक्षा महिला चालक व पुरुष रिक्षा चालकांचे केले मोफत लसीकरण



**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोरोनाने अनेकांच्या व्यवसायाची घडी विसकटली आहे त्यात रिक्षा चालकांला मोठया आर्थिक संकटाला सामोरे जावं लागत आहे सध्या लसीकरणाचा तुटवडा सर्वत्र जाणवतो पैसे देऊन रिक्षा चालकांना लस घेणं अवघड असल्याने अनेक रिक्षा चालक लस घेत नाही त्या मुळे कोरोनाने अनेकाला जीव गमावावे लागले. याचाच विचार करून डाऊ केमिकल इंटरनॅशनल प्रायव्हेट लिमिटेड, क्रोडा, एविनिक इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, ओवेन्स कॉर्ननिग (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड. या कंपनीच्या सहकार्याने आणि फ्रीडम फॉर यु फांऊंडेशन यांच्या माध्यमातुन पनवेल मध्ये रिक्षा चालकांचे लसीकरण तसेच, बिगारी कामगार, एस टी ड्राइवर, ट्रान्सपोर्ट चे ड्राइव्हार, आदिवासी नागरिक यांना पनवेल येथील पटवर्धन हॉस्पिटल येथे कॅम्प लावून हजारो मोफत लसीकरण केले.

या साठी विशेष मेहनत अविनाश पाटील यांनी घेतली यावेळी रिक्षा चालकांसाठी लस उपलब्ध करून दिल्या बद्दल रिक्षा प्रतिनिधी पत्रकार संतोष शिवदास आमले, बाळासाहेब झोडगे, मच्छिंद्र पाटील, सौ पूनम शिवशरण, व रिक्षाचालकांनी आभार मानले आहेत.

# संक्षिप्त...

## संत शिरोमणी नामदेव महाराज यांची ६७१ वी संजिवनी समाधी सोहळा साजरा

**दै.रायगड नगरी । तळा**

नामदेव शिंपी समाजाचे आराध्य दैवत संत शिरोमणी नामदेव महाराज यांच्या ६७१ वी संजीवनी समाधी (पुण्यतीथी) श्री राधाकृष्ण व नामदेव महाराज (तळा) मंदिरात आज साजरी करण्यात आली.

पारंपारीक पद्धतीने सकाळी ५.३० ते ८ वा.पर्यंत काकड आरती, षोडपचारी पुजा, अर्चा सालकरी व्यवस्थापक नितीन मुद्राळे यांच्या हस्ते करण्यात आली. दुपारी १ वा महाआरती व. महाप्रसाद अशा सोहळ्याचे आयोजन व्यवस्थापक कार्यकारी मंडळ अध्यक्ष यांनी केले होते. प्रतीवर्षी विविधसांस्कृतिक कार्यक्रम, विद्यार्थी गुणगौरव कार्यक्रम प्रमुखपाहुणे निमंत्रित केले जातात व मान्यवर व्यक्तीचा सन्मान केला जातो. मागील वर्षात कोरोना सक्रंमण काळ अधिक प्रमाणात असल्याने व अजूनही कोरोना महामारीचे संकट टळले नसल्याने धार्मिक विधी करून साध्या पद्धतीने शासकीय नियमांचे पालन करीत पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

## शिवराज प्रकल्पग्रस्त सामाजिक संस्थेच्या वतीने पूरग्रस्तांना मदतीचा हात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरातील शिवराज प्रकल्पग्रस्त सामाजिक संस्थेच्या वतीने पोलादपूर तालुक्यातील दरडग्रस्त गाव वाकण, व बौद्धवाडी येथे मदत गृहोपयोगी वस्तू व कपड्यांची मदत करण्यात आली

यावेळी पोलादपुर तहसीलदारमध्ये शिवराज प्रकल्पगस्त सामाजिक संस्थेचे अध्यक्ष शिवसेना स्थानिकनेते विश्वास जगन्नाथ पेटकर यांना नायब तहसीलदार पोलादपूर आदमुठे यांच्या हस्ते संस्थेला प्रशस्तीपत्र देण्यात आले. यावेळी ससाणे (उपलेखापाल), परशुराम पाटील (महसूल सह्यक), आशिष मोरे (कोतवाल) स्थानिक नारायण साने व हरीचंद्र पेटकर, सुरेश पाटील,व निलेश पाटील उपस्थित होते. यावेळी शिवराज प्रकल्पगस्त सामाजिक संस्थेचे प्रवीण पाटील(उपाध्यक्ष), प्रदीप पाटील (खजिनदार), राज दरे (सचिव), अतुल पाटील,नरेश म्हात्रे,भालचंद्र पेटकर,राहुल पाटील,ओंकार पाटील यांनी मेहनत घेतली.




### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांच्या उपस्थितीत पर्यटक मार्गदर्शक प्रशिक्षणउपक्रमाचा समारोप संपन्न

### पर्यटक मार्गदर्शकांना अधिक सक्षम होण्यासाठी भविष्यात अद्यावत प्रशिक्षण दिले जाईल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कर्नाळा व फणसाड अभयारण्य येथे येणाऱ्या पर्यटकांना अभयारण्यातील महत्त्वाच्या स्थळांचे अभ्यासपूर्ण मार्गदर्शन मिळावे, पर्यटन मार्गदर्शक म्हणून स्थानिक आदिवासी तरुण-तरुणींना प्राधान्याने रोजगार उपलब्ध व्हावा, या संकल्पनेतून पर्यटक मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले होते. या ठिकाणी या संकल्पनेला यश मिळाल्यास दुसरीकडेही या संकल्पनेची भविष्यात पुनरावृत्ती करता येईल, येथे घडणाऱ्या पर्यटक मार्गदर्शकांना भविष्यात वेळोवेळी अद्यावत प्रशिक्षण दिले जाईल, जेणेकरून ते अधिक सक्षम होतील, असे प्रतिपादन पर्यटन राज्यमंत्री तथा पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांनी आज कर्नाळा अभयारण्य येथे केले.



रायगड जिल्ह्यातील कर्नाळा पक्षी अभयारण्य व फणसाड अभयारण्य परिसरातील स्थानिक आदिवासी समाजातील बेराजगार युवक-युवतींना राष्ट्रीय पातळीवरील गाईड निर्माण करणाऱ्या ग्वाल्हेर येथील आयआयटीटीएम या भारत सरकार मान्यताप्राप्त संस्थेमार्फत दि. ०२ ते ०६ ऑगस्ट २०२१ या कालावधीत देण्यात आलेल्या प्रशिक्षणाचा समारोप कार्यक्रम पनवेल येथील कर्नाळा पक्षी अभयारण्य येथे आज पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला, त्यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी पर्यटन संचालनालय कोकण विभागाचे उपसंचालक श्री. हनुमंत हेडे, उपवनसंरक्षक (वन्यजीव) भानुदास पिंगळे , सहाय्यक वनसंरक्षक (वन्यजीव) फणसाड नंदकिशोर कुप्ते, परिक्षेत्र वन अधिकारी प्रदीप चव्हाण, पर्यटन संचालनालयचे सहाय्यक संचालक (आयटी) व ट्रेनिंग योगेश निरगुडे, फणसाड अभयारण्य परिक्षेत्र वनाधिकारी भोसले तसेच कर्नाळा व फणसाड अभयारण्यातील कर्मचारी वृंद उपस्थित होते. पालकमंत्री कु. आदिती तटकरे पुढे म्हणाल्या, महाराष्ट्र हे पर्यटनदृष्ट्या संपन्न राज्य आहे. पर्यटनावर आधारित विविध उद्योगधंदे पर्यटनस्थळी व तीर्थक्षेत्र स्थळी विकसित होत आहेत. त्याचप्रमाणे पर्यटनस्थळी तज्ज्ञ पर्यटक मार्गदर्शक(गाईड) हा उत्तम पर्याय विकसित होत आहे. स्थानिक पातळीवरील मार्गदर्शन विषयक ज्ञान, कौशल्य आत्मसात करुन त्याच्या सहाय्याने राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर पर्यटन व्यवसाय व रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात, त्यासाठीचे कौशल्य आत्मसात करण्याची संधी या उपक्रमाच्या माध्यमातून पर्यटन विभाग स्थानिकांना देत आहे.

रायगड जिल्ह्याचे नाव कसे वाढविता येईल तसेच या जिल्ह्याची ख्याती सर्वदूर नेण्यासाठी गाईड हाच माध्यम असल्याचे नमूद करून पालकमंत्री कु.तटकरे यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या.

स्थानिक तरुण-तरुणींनी या उपक्रमाला उत्तम प्रतिसाद द्यावा व पर्यटक मार्गदर्शक (गाईड)चे कौशल्य आत्मसात करावे, पर्यटन राज्यमंत्री तथा पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत कर्नाळा पक्षी अभयारण्याजवळील २० तर फणसाड अभयारण्याजवळील एकूण १० अशा एकूण ३० प्रशिक्षणार्थींनी सहभाग नोंदविला होता. यात ४ मुलींनीही सहभाग नोंदविला होता. यावेळी प्रत्येक प्रशिक्षणार्थीला या उपक्रमातील सहभागाबद्दल पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

जिल्ह्यातील कर्नाळा पक्षी अभयारण्य व फणसाड अभयारण्य या ठिकाणी पर्यटक, पक्षी अभ्यासक व निसर्गप्रेमी यांची कायम पसंती असते. शालेय विद्यार्थ्यांच्या सहली, अभ्यास दौरे या दोन्ही पर्यटनस्थळी होत असतात. येथे येणाऱ्या पर्यटकांना अभयारण्यातील महत्त्वाच्या स्थळांचे अभ्यासपूर्ण मार्गदर्शन मिळावे, पर्यटन मार्गदर्शक म्हणून स्थानिक आदिवासी तरुण-तरुणींना प्राधान्याने रोजगार उपलब्ध व्हावा, अशी पर्यटन राज्यमंत्री तथा रायगड जिल्हा पालकमंत्री ना. कु.आदिती तटकरे यांची संकल्पना आहे.

त्यानुसार भारत सरकारचा ऑनलाईन पर्यटन सुलभ मार्गदर्शक हा अभ्यासक्रम महाराष्ट्रातील बेरोजगार युवकांसाठी अधिकृतरित्या महाराष्ट्र शासनाने प्रमाणित करून सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. हे प्रशिक्षण वर्ग पर्यटन संचालनालयामार्फत आयोजित करण्यात आले होते. त्यासाठी संचालक, डॉ. धनंजय सावळकर, पर्यटन संचालनालय यांनी पुढाकार घेतला होता. यावेळी प्रशिक्षणार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करून या प्रशिक्षणाचा कसा लाभ झाला तसेच पुढे काय साध्य करता येईल यावर भाष्य करून पालकमंत्री महोदयांचे आभार मानले. उपवनसंरक्षक श्री. पिंगळे यांनी पुढील वाटचालीसाठी प्रशिक्षणार्थ्यांना शुभेच्छा देऊन आपले कौशल्य कसे विकसित करता येईल, याबाबत मार्गदर्शन केले.

## मतदार यादीतील फोटो सादर करण्यासाठी मुदतवाढ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भारत निवडणूक आयोगाने ०१ जानेवारी २०२१ या अर्हता दिनांकावर आधारीत राज्यातील सर्व विधानसभा मतदारसंघाच्या छायाचित्र मतदार यादीचा संक्षिप्त पुन:रिक्षण कार्यक्रम जाहिर केला आहे. या कार्यक्रमांतर्गत १०० टक्के शुध्द मतदार यादी तयार करण्याची मोहीम भारतीय निवडणूक आयोगाने सुरु केली आहे. ४ ऑगस्ट आयोजित राजकीय पक्ष यांचे बैठकीमध्ये फोटो सादर करणेस मुदतवाढीची मागणी करण्यात आल्याने. सदरील फोटो सादर करणेस दि. ८ ऑगस्ट रोजी पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. तसेच. ९ ऑगस्ट पासुन नावे वगळणीची कार्यवाही सुरू करण्यात येईल याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. असे आवाहन (दत्तात्रेय नवले) मतदार नोंदणी अधिकारी, १८८ पनवेल विधानसभा मतदार संघ तथा उपविभागीय अधिकारी, पनवेल विभाग पनवेल यांनी केले आहे

१८८ पनवेल विधानसभा मतदारसंघात एकूण ५७० मतदार यादीभागामध्ये ४६ हजार ६६ मतदारांचे फोटो मतदार यादीत नसल्याचे आढळून आले आहे. ज्या मतदारांचे छायाचित्र मतदार यादीत नाही, अशा मतदारांनी आपले फोटो ८ऑगस्ट पर्यंत मतदान केंद्रस्तरीयअधिकारी / तलाठी किंवा निवडणुक शाखा तहसिलदार कार्यालय पनवेल येथे जमा करावेत कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. असे आवाहन (दत्तात्रेय नवले) मतदार नोंदणी अधिकारी, १८८ पनवेल विधानसभा मतदार संघ तथा उपविभागीय अधिकारी पनवेल विभाग पनवेल यांनी केले आहे.

## पनवेल तालुका पोलिसांनी केली गावठी दारू नष्ट

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील दिघाटी गाव येथे गावठी हातभट्टीची दारू तयार करत असताना तालुका पोलिसांनी धडक कारवाई करून एकाला अटक केली आहे. पोलिसांनी हजार रुपये किमतीचे रसायन नष्ट केले असून या प्रकरणी सखाराम मुकुंद पाटील (वय ५७) याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

दिघाटी गाव येथील जंगलात ओढ्याच्या किनारी झाडाझुडपाच्या आडोशाला सखाराम मुकुंद पाटील हा दारू गाळण्यासाठीची बेकायदेशीर भट्टी लावून गावठी हातभट्टीची दारू तयार करण्याची करत असल्याची माहिती तालुका पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविंद्र दौंडकर, पोलीस उपनिरीक्षक गजानन टाकळे, पोलीस हवालदार संतोष शिंदे व त्यांच्या पथकाने या ठिकाणी धाड टाकली. येथील जंगलात गावठी हातभट्टीची दारू जप्त केली. त्यावेळी प्लॅस्टिक ड्रममध्ये आंबवलेले रसायन पोलिसांनी नष्ट केले आहे. तसेच एलपीजी गॅस, शेगडी, अल्युमिनियमचे भांडे, गावठी दारू जप्त केली आहे.



## तहसीलदार दिलीप रायन्नावर यांना उत्कृष्ट अधिकारी म्हणून पुरस्कार प्रदान



**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागातर्फे दरवर्षी १ ऑगस्टला महसूल दिन साजरा केला जातो , दरवर्षी महसूल दिनाचे औचित्य साधून महसूल विभागातील कर्मचाऱ्यांना उत्कृष्ट अधिकारी आणि कर्मचारी पुरस्कार प्रदान केले जातात. यावर्षी सुधागडचे तालुक्याचे तहसीलदार दिलीप रायन्नावर याना त्यांनी केलेल्या चांगल्या कामाबद्दल जिल्हाधिकारी कार्यालयात उत्कृष्ट अधिकारी या पुरस्काराने जिल्हाधिकारी निधी चौधरी यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. सुधागड तालुक्यात दिलीप रायन्नावर रुजू झाल्यापासून त्यांनी अनेक अभिनव उपक्रम हातात घेतले त्यामाध्यमातून आदिवासी जनतेची कामे, वृक्ष लागवड, जंगल संवर्धन असे उपक्रम हाती घेतले आहेत त्यामुळे योग्य अधिकाऱ्याला हा पुरस्कार मिळाल्याचा भावना नागरिकांकडून व्यक्त होत असून त्यांच्यावर तालुक्यातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे

## महिसदरा नदीवरील पुलाच्या कठड्यांना बसविले लोखंडी पोल



**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

मुंबई -गोवा या राष्ट्रीय महामार्ग १७ वरील पुई ग्रामपंचायत हद्दीतील महीसदरा नदीवरील पुल वाहातुकीसाठी धोकादायक असुन या पुलाचे कठडे तुटले असुन या कठड्यांना दोरीचा आधार दिला आहे.अशी बातमी २८ जुलै रोजी वृत्तपत्रातून प्रकाशित करण्यात आली यानंतर फक्त आठ दिवसात या बातमीची दखल घेत या पुलाच्या दोन्ही बाजूच्या कठड्यांना नवीन लोखंडी पोल बसवले असून यामुळे प्रवाश्यांनी वृत्तपत्राचे आभार मानले. या महिसदरा नदीच्या पुलाच्या दोन्ही बाजूच्या कठड्यांना लोखंडी पोल बसविले असल्यामुळे थोडा फार प्रमाणात धोका टळला असला तरीही हा पूल वाहतुकीसाठी धोकादायक आहे. कारण या पुलाचे परीक्षण करणे जरुरीचे आहे. या पुलावरुन अवजड वाहन गेला तर हा पूल पूर्णपणे हदरला जाऊन वरखाली जम मारल्या सारखा दिसत आहे.अशा वेळी योग्य ती खबरदारी घेणे जरुरीचे आहे.नाहीतर सावित्री नदी पुलाच्या दुर्घटनाच्या सारखी परिस्थिती ओढवण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

## पुरग्रस्तांना जीवनावश्यक साहित्याचे वाटप

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

जय हनुमान क्रीडा मंडळ व ग्रामस्थ मंडळ तळवली तर्फे अष्टमी रोहा यांच्या वतीने महाड व पोलादपूर येथील पुरग्रस्तांना प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघाच्या वतीने करण्यात आले.यावेळी पर्यावरण विभाग महाराष्ट्र सरचिटणीस सचिन मोरे,परशुराम रटाटे,गणेश खरिवले व अन्य सहकारी उपस्थित होते हात मदतीचा देऊन जीवनावश्यक साहित्याचे वाटप करण्यात आले.

एकमेकांना देऊ साथ, पुढे करू मदतीचा हात या भावनेतून पुरग्रस्तांना पाणी बॉटल, बिस्किट पुडे, पत्रावळी, ग्लास, साब, कोलगेट, टॉवेल, कडधान्ये आदी जीवनावश्यक साहित्याचे वाटप करण्यात आले.

## कस्टम हाऊसच्या इमारतीचे प्लास्टर निखळले

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जेएनपीटी पीयुबी इमारती जवळ असलेल्या कस्टम हाऊसच्या इमारतीच्या गॅलरीचा काही भाग गुरूवारी (दि५) निखळला. सुदैवाने हा मलबा कोणाच्या अंगावर पडला नसल्यामुळे मोठी दुर्घटना घडली नाही. पीयुबी इमारतीजवळ असलेली ही जेएनसीएचची इमारत नेहमी गजबजलेली असते. रोज हजारो कस्टम एजंट आणि शिपींग कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांचा येथे राबता असतो. मात्र सुदैवाने येथे मोठी दुर्घटना घडली नाही. या अपघातामुळे इमारतीच्या बांधकामाबद्दल प्रश्न चिन्ह उपस्थित करण्यात येत आहे.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते आम्ही मौजे : वेश्वी, ता.उरण, जि.रायगड येथील खाली नमूद केलेली मिळकत अशोक लक्ष्मीनारायण सोमाणी यांजकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| वेश्वी, ता.उरण, जि.रायगड | २९/२० | ०-१२-०० | ०.४७ |

तरी सदर मिळकतीचे बाबतीत अथवा तिच्या कोणत्याही हिश्श्याचे बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्तखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अॅटॅचमेंट, लीन, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा वगैरे कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील पत्यावर प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी हरकती प्रत्यक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आम्ही सदर मिळकतीचे विक्री व हस्तांतरणाचे व्यवहार पूर्ण करू व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

दि.०६/०८/२०२१

**सही/-**
**कनू एम.ठक्कर**
**७, राधा निवास, ७ राजावाडी रोड,**
**घाटकोपर (पू), मुंबई-४०००७७**
**मो.नं.९३२२५५१४१४**

---

मे.मुजावर सो॰

अर्जदारांतर्फे वकील
श्री.इंद्रपाल म. पाटील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर), पनवेल यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.९०३/२०२१
नि.नं.१५/ड
ने.ता.०३/०९/२०२१

१) श्रीमती.निर्मला अनिल बनसोडे
वय : ४९ वर्षे, धंदा : घरकाम
राहणार : रुम नं.२०२, रत्नप्रभा को.ऑ.हौ.सो.,
प्लॉट नं.इ/३२, सेक्टर ३, बेलपाडा,
खारघर तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड — अर्जदार

विरुद्ध

१) श्री.प्रवीण अनिल बनसोडे
वय : ३० वर्षे, धंदा : नोकरी
राहणार : रुम नं.२०२, रत्नप्रभा को.ऑ.हौ.सो.,
प्लॉट नं.इ/३२, सेक्टर ३, बेलपाडा,
खारघर तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड
२) श्री.अल्विन अनिल बनसोडे
वय : २८ वर्षे, धंदा : नोकरी
राहणार : रुम नं.२०२, रत्नप्रभा को.ऑ.हौ.सो.,
प्लॉट नं.इ/३२, सेक्टर ३, बेलपाडा,
खारघर तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड
३) तेजस्वीनी रोहित भोसले
वय : २८ वर्षे, धंदा : घरकाम
राहणार : बुद्ध समाज मंदिर, गोरवाड,
कोल्हापूर, महाराष्ट्र — सामनेवाला

वरील अर्जदार यांचे पती आणि सामनेवाला क्र.१ ते ३ यांचे वडील मयत अनिल बापू बनसोडे यांचे दि.१०/१०/२००६ रोजी राहते घर रुम नं.४, मानस इमारत जवळ पी.एल.लोखंडे मार्ग, चेंबूर, मुंबई : ४०००८९. येथे निधन झाले. मयत अनिल बापू बनसोडे यांचे नावे असलेली मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**
**रुम नं.२०२, रत्नप्रभा को.ऑ.हौसिंग सोसायटी, प्लॉट नं.इ/३२, सेक्टर ३, मौजे : बेलपाडा, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड, एकूण क्षेत्रफळ ५०.१८ चौ.मी. बिल्टअप**

वरील मिळकतीबाबत अर्जदार यांनी वारस दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारस दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात दाखल करावी.

वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०६ माहे ऑगस्ट सन २०२१ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.रावसाहेब कोर्ट

अर्जदारांचे वकील : अॅड.एकनाथ जी.खुटले

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.६५२/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.३०/०८/२०२१

१) माधुरी हरिश्चंद्र ठाकूर उर्फ
सौ.माधुरी प्रकाश कर्वे, वय : ५० वर्षे,
रा.हाऊस नं.१२२६, शिरढोण,
ता.पनवेल, जि.रायगड
२) श्री.अशोक हरिश्चंद्र ठाकूर, वय : ४६ वर्षे
रा.जरी मरी मंदिर जवळ, कोपर,
पो.गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड
३) श्री.किरण हरिश्चंद्र ठाकूर, वय : ४५ वर्षे
४) मनिषा हरिश्चंद्र ठाकूर, वय : ३७ वर्षे
५) कविता हरिश्चंद्र ठाकूर, वय : ३६ वर्षे
क्र.३ ते ५ रा.तळ्याचा पाडा, जरी मरी,
मंदिर जवळ, कोपर, पो.गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, कै. ताराबाई हरिश्चंद्र ठाकूर ह्या दि.२८/०६/२०२० रोजी मौजे : कोपर, पो. गव्हाण, ता.पनवेल येथे मृत्यू पावल्या आहेत. त्यांचे खालील वर्णनाच्या मिळकतींबाबत वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी अर्ज केलेला आहे.

**जमिनींचे वर्णन**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) |
|---|---|---|---|
| खारकोपर-४१ | ३ | ९ | ०-१०-६ |
| | ४ | १ | ०-२९-५ |
| वहाळ-४६७ ब | २६३ | १ | ०-१९-० |
| वहाळ-४६६ | २६४ | ५ | ०-०१-० |
| | २६७ | ६ | ०-०८-० |
| | २९९ | ६ | ०-०६-० |
| | ३१८ | १ | ०-०६-० |
| | ३४४ | १ | ०-१५-० |
| | ३४३ | २ | ०-१२-० |
| | ३४५ | ५ | ०-०४-० |
| | ३७७ | ३ | ०-९१-० |
| | ३७७ | २ | ०-१३-० |
| वहाळ-७३ | ३५५ | ५ | ०-५१-० |

काही संपादीत मिळकती संदर्भात सिडकोचे साडेबारा टक्के निवासी भूखंड योजनेंतर्गत खालील वर्णनाचा भूखंड वाटप झालेला आहे.

**भूखंडाचे वर्णन**

| नोड | सेक्टर क्र. | भूखंड नं. | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| उलवे | ३ | १५ | १८९८.०९ |

अर्जदार हे कै.ताराबाई हरिश्चंद्र ठाकूर यांचे कायदेशीर वारसदार आहेत. त्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास, त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांच्या हरकती सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये हरकत सादर न केल्यास ना.कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार व सामनेवाली यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.०६/०८/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**